## धिटाई

मनाची कवाड, उघडी सताड,
साजण चाहूल - अलगद !

रुपेरी चांदणे, चंदेरी किरणे,
रात अंधारली - उजळत !

कोरड्या अंगणी, सडा रातराणी,
भोवताल सारा - गंधावत !

खुळावला वारा, फिरे भरारा,
थबके दारात - रेंगाळत !

साजण-साजणी, थोडेसे लाजुनी,
दाखवी धिटाई - सुखावत !

**- प्रीती देशपांडे**

**www.meetipreeti.com**